श्रीम.सोहनी सुभाष पुरनाळे,
उपाध्यापक,जि.प.प्रा.शाळा बाबुर्डी घुमट
ता.अहिल्यानगर यांना पदावरुन तात्पुरत्या
स्वरुपात दूर करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
शिक्षण विभाग प्राथमिक
जा.क्र.कार्या-1/पिई-6/1147/2025
अहिल्यानगर दिनांक 14/11/2025

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक न्यायाप्र-2023/प्र.क्र.118,दिनांक 18/06/2024
2. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक न्यायाप्र-2023/प्र.क्र.118/आस्था-14, दिनांक 16/06/2025
3. श्री.चंद्रशेखर पंचमुख यांचेकडील दि.20/06/2025 व 08/07/2025 रोजीचा तक्रार अर्ज.
4. या कार्यालयाकडील जा.क्र.कार्या-1/पीई-6/479/2025,दिनांक 21/07/2025 रोजीचे पत्र.
5. पडताळणी समिती पंचायत ,पारनेर यांचेकडील जा.क्र. आस्था-4/04/2025 दिनांक 26/08/2025 रोजीचा प्राप्त पडताळणी अहवाल.
6. या कार्यालयाकडील जा.क्र.कार्या-1/पीई-6/828/2025,दिनांक 16/10/2025 कारणे दाखवा नोटीस.
7. गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती अहिल्यानगर यांचेकडील जा.क्र.अ-4/800/2025, दि.03/11/2025 चे पत्रान्वये श्रीम.जयश्री हरिश्चंद्र रहाटडे,उपाध्यापक यांचेकडील दिनांक 03/11/2025 रोजीचा प्राप्त खुलासा

ज्याअर्थी महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाकडील दिनांक 18/06/2024 चे शासन निर्णयाचे अनुषंगाने प्राथमिक शिक्षक ऑनलाईन जिल्हांतर्गत बदलीबाबत सुधारित धोरण निश्चित करणेत आलेले आहे.त्यानुसार प्राथमिक शिक्षक जिल्हांतर्गत बदली प्रक्रिया सन 2025 ऑनलाईन प्रणालीव्दारे पार पडलेली आहे. प्रकरणी वरील संदर्भ क्र.3 चे प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने काही महिला शिक्षिकांनी संवर्ग 1 मध्ये घटस्फोटीत व परित्यक्ता या प्राधान्यक्रमामध्ये लाभ घेतलेल्या संबंधीत प्राथमिक शिक्षकांची चौकशी, पडताळणी करुन खोटयांना शोधून,त्यांना निलंबित करुन तात्काळ कारवाई करणेबाबत तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

तसेच दरम्यान महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाकडील दिनांक 16/06/2025 चे परिपत्रक प्राप्त झालेले असुन सदर परिपत्रकातील मुद्दा क्र. 3 (iv) विशेष संवर्ग-1 मधून बदलीसाठी अर्ज सादर करणा-या घटस्फोटीत/परित्यक्ता महिला शिक्षकांबाबत काही अनियमितता आढळून आल्यास संबंधित घटस्फोटीत शिक्षिकेच्या मा.न्यायालयाचे मंजूर केलेल्या घटस्फोटाच्या प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत,परित्यक्ता शिक्षकेने ती पतीबरोबर राहत नसल्याबाबत सादर केलेले स्वयंघोषणापत्र,त्यांच्या रहिवासाचे दाखले,आधार कार्ड शिधापत्रिका इत्यादीवरुन पडताळणी करणे व आवश्यकतेनुसार अशा महिला शिक्षिकांच्या निवासी पत्त्यावर प्रत्यक्ष जाऊन शहानिशा करणेबाबत निर्देश प्राप्त झालेले आहे.

त्यानुसार या कार्यालयाकडील वरील संदर्भ क्र.4 अन्वये सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना उक्त प्रमाणे पडताळणी करीता तालुकास्तरावर विस्तार अधिकारी (शिक्षण) समिती प्रमुख, अंगणवाडी पर्यवेक्षिका, तालुका शिक्षण विभागातील लिपीक कर्मचारी यांचे समिती स्थापन करुन पडताळणी करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. सबब पडताळणी समिती पारनेर यांनी नगर तालुक्यातील घटस्फोटीत/परित्यक्ता महिला शिक्षकांबाबत पडताळणी केलेली आहे. वरील संदर्भ क्र.5 अन्वये पडताळणी समिती,पंचायत समिती, पारनेर यांचेकडील पडताळणी अहवाल प्राप्त झालेला आहे. उक्त अहवालानुसार श्रीम.सोहनी सुभाष पुरनाळे,उपाध्यापक, जि.प.प्रा.शाळा बाबुर्डी घुमट,ता.अहिल्यानगर यांनी सन-2025 चे बदली प्रक्रियेमध्ये संवर्ग-1 घटस्फोटित या प्राधान्यामध्ये जिल्हांतर्गत बदलीचा लाभ घेतलेला असून श्रीम.सोहनी सुभाष पुरनाळे,उपाध्यापक हया एकटया राहात नसून कोणीतरी अनोळखी व्यक्ती सोबत राहत असलेबाबत व सोबत 5-6 वर्षाची एकम मुलगी राहत असलेबाबत अहवाल सादर केलेला आहे.

प्रकरणीश्रीम.सोहनी सुभाष पुरनाळे,उपाध्यापक,जि.प.प्रा.शाळा बाबुर्डी घुमट,ता.अहिल्यानगर यांचे संदर्भ क्र.7 चे प्राप्त खुलाश्यानुसार गावातील स्थानिकांनी एकटी घटस्फोटीत महिला पाहून मला त्रास देण्याचा प्रयत्न केलेला असून माझ्या विरुध्द

खोटया तक्रारी केलेल्या असून कोणत्याही प्रकारचे तथ्य नसुन घटस्फोटाच्या अहवालावावत कोणत्याही प्रकारची संदिग्धता नसून मा.न्यायालयाचा आदेश सादर केलेला आहे.

मात्र समितीचे प्राप्त अहलवालाचे अवलोकन केले असता श्रीम.सोहनी सुभाष पुरनाळे,उपाध्यापक हया एकटया राहात नसून कोणीतरी अनोळखी व्यक्ती सोवत राहत असलेबाबत व सोवत 5-6 वर्षाची एकम मुलगी राहत असलेबाबत अहवाल सादर केलेला आहे.

वरील संदर्भ क्र.1 चे शासन निर्णयातील मुद्दा क्र. 5.10.5 नुसार शिक्षकाने जाणीवपुर्वक खोटी व दिशाभुल करणारी माहिती भरुन बदलीचा लाभ घेतल्यास संबंधीता शिक्षकांचे निलंबन करुन त्यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करणेची तरतुद आहे. परिणामी श्रीम.सोहनी सुभाष पुरनाळे,उपाध्यापक यांचेकडुन महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम 1967 चा 03 भंग झालेला आहे. सबब श्रीम.सोहनी सुभाष पुरनाळे,उपाध्यापक,जि.प.प्रा.शाळा बाबुर्डी घुमट,ता.अहिल्यानगर यांचे विरुध्द शिस्तभंग कारवाई करण्याचे या प्राधिकरणाने योजिले आहे.

त्याअर्थी आता मी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर मला महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम 1964 चे भाग 2 मधील नियम 3 (1) (अ) अन्वये मला प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करुन याव्दारे उक्त श्रीम.सोहनी सुभाष पुरनाळे,उपाध्यापक,जि.प.प्रा.शाळा बाबुर्डी घुमट,ता.अहिल्यानगर यांना सदर आदेशाच्या दिनांकापासून जिल्हा परिषद सेवेतून निलंबित करीत आहे.

आणखी असाही आदेश देत आहे की हा आदेश अंमलात राहिल तेवढ्या कालावधीत श्रीम.सोहनी सुभाष पुरनाळे,उपाध्यापक,जि.प.प्रा.शाळा बाबुर्डी घुमट,ता.अहिल्यानगर यांचे मुख्यालय पंचायत समिती ....श्रीगोंदा...... येथे राहिल आणि श्रीम.जयश्री हरिश्चंद्र रहाटडे,उपाध्यापक, जि.प.शाळा जाधववाडी, ता.अहिल्यानगर यांना गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती ....श्रीगोंदा....... याच्या पूर्वपरवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

श्रीम.सोहनी सुभाष पुरनाळे,उपाध्यापक,जि.प.प्रा.शाळा बाबुर्डी घुमट,ता.अहिल्यानगर यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेततर सेवा आणि निलंबन बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम 1981 मधील 68 च्या तरतुदीनुसार निलंबन भत्ता देण्यात यावा.

निलंबनाच्या कालावधीत श्रीम.सोहनी सुभाष पुरनाळे,उपाध्यापक, जि.प.प्रा.शाळा बाबुर्डी घुमट, ता.अहिल्यानगर यांनी खाजगी नोकरी स्विकारु नये. त्यांनी तसे केल्यास ते दोषारोप त्यांच्यावर ठेवण्यात तसेच ते निलंबन निर्वाह भत्ता गमविण्यास पात्र ठरतील. निलंबनाच्या कालावधीत निलबन भत्ता जेव्हा जेव्हा देण्यात येईल.त्यावेळी आपण खाजगी नोकरी स्विकारली नाही अथवा कोणताही खाजगी धंदा वा व्यवसाय करीत नाही. अशा आशयाचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

निलंबनाच्या कालावधीत श्रीम.सोहनी सुभाष पुरनाळे,उपाध्यापक यांना निलंबन निर्वाहभत्ता देण्याबावतची कार्यवाही गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती श्रीगोंदा जि.अहिल्यानगर हे करतील.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक 2025 1114160126 असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 14-11-2025 21:36:54

आनंद भंडारी,(भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्रीम.सोहनी सुभाष पुरनाळे,उपाध्यापक,जि.प.प्रा.शाळा बाबुर्डी घुमट,ता.अहिल्यानगर
व्दारा गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती अहिल्यानगर

प्रत:-गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती अहिल्यानगर

2/- सदरचा आदेश संबंधितास बजावून दुस-या प्रतिवर प्रत मिळाली बाबतची तारखेसह स्वाक्षरी घ्यावी व तारखेसह स्वाक्षरी असलेली प्रत त्वरीत इकडेस सादर करावी.

प्रत:- खाते चौकशी, कार्यासन-2,शिक्षण विभाग (प्रा),जि.प. अहिल्यानगर पुढील कार्यवाही साठी
प्रत:- गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती अहिल्यानगर जि. अहिल्यानगर
प्रत:- गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर

स्वाक्षरी /-
आनंद भंडारी,(भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर